PDF Compressor Free Version




RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR





■ Volume - 72 ■ Issue- 235 ■ Marathi Daily ■ Teusday 28/5/2024 ■ Pages - 6 ■ Price- Rs. 3

अग्रलेख:
सोना कितना सोना है? पान २



संभाव्य आपत्तीच्या मुकाबल्यासाठी सज्ज रहा पान ३


भिंगारमध्ये प्रथमच फुलले 'ताम्हणवृक्ष' पान ६

# अहमदनगर नाबाद ५३४




चाँदबिबी महाल




ब्रिटीश सैन्याचा नगर किल्ल्याला वेढा




नितीश कटारिया यांनी घेतलेले नगर शहराचे नयनरम्य ड्रोन छायाचित्र.



लक्कड महाल



फराहबक्ष महाल



किल्ल्यातील महाल

### ज्येष्ठ कवयित्री माधुरी हुद्देदार यांचे 'नगर गीत'

दगडांच्या या राकट देशा
रचलेले हे शिल्प शुभंकर
कणखर निर्भय शब्दांवरती
वसलेले हे नगर मनोहर.

कथाकथातून ओठी इथल्या
राजे, राण्या, महाल, किल्ले
येताजाता सहज भेटती
इतिहासाचे सोनदाखले
संतांच्या या भूमीवरती
शांत रसाचा झरतो पाझर
कणखर निर्भय
शब्दांवरती......

यज्ञ पेटता स्वातंत्र्याचा
समिधा इथल्या घराघरांतून
सर्वस्वाची करून होळी
तप्त निखारे तनामनातून
या मातीतील वीर झुंजले
लक्ष्य असू दे किती भयंकर
कणखर निर्भय
शब्दांवरती......

नव्या युगाची पहाट आता
हसूनी पाहती वृक्ष येथले
तरूण मनांच्या नव्या लोचनी
सळसळणारे स्वप्न साजिरे
तृप्त होऊनी जसा बघावा
नव्या जुन्याचा संगम सुंदर
कणखर निर्भय
शब्दांवरती......

सर्व धर्म हे इथे नांदती
हातामधूनी हात घालूनी
सृजन क्षणांचे फुलती अंकुर
किती मनांच्या हिरव्या रानी
आनंदाचा या नगरीतून
सदा दरवळे प्रसन्न जागर
कणखर निर्भय शब्दांवरती
वसलेले हे नगर मनोहर.

## शहरात स्वा. सावरकर जयंती उत्साहात साजरी
# भाजपा, राष्ट्रवादी, मनपातर्फे अभिवादन







**समाचार/नगर-दि.२८**

आज शहरामध्ये स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची १४१ वी जयंती विविध पक्ष, संघटना आणि संस्थांतर्फे उत्साहात चौपाटी कारंजा येथील स्वा. सावरकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत उत्साहात साजरी करण्यात आली.

भाजपाच्यावतीने शहर जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. अभय आगरकर यावेळी म्हणाले, स्वा. सावरकरांनी हिंदू समाजाला संघटित करण्याचे काम केले. विज्ञाननिष्ठ, भाषा पंडित, प्रखर राष्ट्रभक्त आणि समाजसुधारक असणाऱ्या स्वा. सावरकरांचे विचार हे आपल्या जीवनात कसे उतरतील हे पाहिले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जे काम करत आहेत त्याचे बीज स्वा. सावरकरांनीच लावले होते, असे प्रतिपादन अ‍ॅड. आगरकर यांनी यावेळी केले. यावेळी वसंत लोढा, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, सचिन पारखी, महेंद्र गंधे, अनंत देसाई, मयूर बोचूघोळ, सोमनाथ मुळे, राहुल जामगावकर, पियुष जग्गी, सागर शिंदे, वैभव झोटिंग, मंगेश निचाल, महेंद्र तापकिरे, अमोल भंडारे, महेश कुलकर्णी, नाना भंडारे, राजेंद्र दळवी, गोपाल वर्मा, आदिनाथ येंडे, पराग देशमुख, आशिष ताकपिरे, सुचित भळगट, मंगेश निसळ, बाळासाहेब गायकवाड, येंडे आदि उपस्थित होते.

राष्ट्रवादी पक्षाच्यावतीने सचिन जगताप यांनी स्वा. सावरकरांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ते म्हणाले, महान देशभक्त, प्रखर हिंदुत्वाचे भाष्यकार स्वा. सावरकर यांनी शस्त्र आणि शास्त्र दोन्हीतून आपले संपूर्ण जीवन मातृभूमीसाठी झोकून दिले. त्याचबरोबर साहित्याच्या माध्यमातून देशाला दिशा देणारे विचार वेळोवेळी समाजासमोर मांडले. यावेळी संपत बारस्कर, प्रा. माणिक विधाते, प्रा. अरविंद शिंदे, मयूर जोशी, युवराज शिंदे, दीपक खेडकर, अभिजीत खोसे, सुमित कुलकर्णी आदि उपस्थित होते.

अहमदनगर महानगरपालिकेच्यावतीने स्वा. सावरकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सहाय्यक आयुक्त मेहर लहारे, माजी उपमहापौर दीपक सूळ, प्रसिद्धी प्रमुख शशिकांत नजान, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, मयूर जोशी, आदिनाथ येंडे आदि उपस्थित होते.

## केडगावनजीकची घटना
# चाकूचा धाक दाखवून साईभक्तांना लुटले

**समाचार/नगर-दि.२८**

शिर्डी येथे साईबाबांचे दर्शन करून पुण्याच्या दिशेने निघालेल्या कुटुंबाला तिघांनी चाकूचा धाक दाखवून लुटले. नगर – पुणे रस्त्यावर केडगाव उपनगरात हॉटेल कोकणकिंगपासून पुढे ५० मीटरवर रविवारी (दि. २६) पहाटे दोनच्या सुमारास ही घटना घडली. चोरट्यांनी तीन लाख ७२ हजाराचे सुमारे १० तोळ्याचे सोन्याचे दागिने लुटले.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात तिघांविरूध्द जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पार्थ सरथी पटनाईक (वय ४२ रा. हंडेवाडी रस्ता, हडपसर, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. ते पत्नी व मुलांसह त्यांच्या कारमधून शनिवारी (दि. २५) दुपारी दोन वाजता पुणे येथून शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी आले होते. शिर्डी येथून दर्शन करून ते रात्री साडेदहा वाजता पुणे येथे जाण्यासाठी निघाले. रविवारी पहाटे दीड वाजता त्यांनी केडगावातील कोकणकिंग हॉटेलमध्ये जेवण केले. जेवण करून पुण्याच्या दिशेने निघाले असता हॉटेलपासून ५० मीटरवर त्यांनी रस्त्याच्या कडेला लघुशंकेसाठी कार थांबवली. फिर्यादी, पत्नी व मुलगा कारच्या खाली उतरताच तीन अनोळखी त्यांच्या जवळ आले. त्यातील एकाने फिर्यादीला चाकू दाखवून पाचशे रूपये मागितले. दुसरा व्यक्ती पत्नीजवळ गेला व त्याने चाकूचा धाक दाखवून रोकड व दागिण्यांची मागणी केली. पैसे व दागिने दिले नाही तर तुमचे काही खरे नाही असे म्हणून तिसऱ्या व्यक्तीने फिर्यादीच्या पत्नीकडील दोन सोन्याच्या बागड्या, सोन्याचे मंगळसूत्र, तीन सोन्याच्या अंगठ्या असा सुमारे तीन लाख ७२ हजाराचा १० तोळ्यांचा (पान ३ वर)

### उठाठेव

– विवेक मेहेत्रे



'शाब्दिक हल्ला करून प्रसिद्धी' या अर्थी ३ अक्षरी आडनाव हवंय...काय लिहू मी? ''ठाकरे'' की ''ओवेसी''?

### निवडक
## कल्याणीनगर अपघात प्रकरणात डॉक्टरचा इशारा

**पुणे, दि. २८–** अपघातातील अल्पवयीन आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलल्या प्रकरणी काल ससून रुग्णालयाच्या दोन डॉक्टरांना पुणे पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. फ्री प्रेसनं दिलेल्या वृत्तानुसार ससून रुग्णालयातून अटक करण्यात आलेल्या तिघांपैकी आरोपी डॉ. अजय तावरे याने धमकीवजा इशारा दिला आहे. मी शांत बसणार नाही, सगळ्यांना उघडं पाडेन, या वृत्तामध्ये नमूद करण्यात आलं आहे.

## वाणीनगर वादग्रस्त शेतजमीन प्रकरण
# शहर काँग्रेसचे पोलिस अधीक्षकांना निवेदन



**समाचार/नगर-दि.२८**

पाईपलाईन रस्त्यावरील वाणीनगर येथील शेतजमिनीच्या ताबामारी प्रकरणी गेल्या काही दिवसांपासून आरोप–प्रत्यारोप होत आहेत. आज या प्रकरणात शहर काँग्रेसने उडी घेत अध्यक्ष किरण काळे यांनी शिष्टमंडळासह जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेत वाणी कुटुंबातील महिलेच्यावतीने निवेदन दिले.

किरण काळे म्हणाले की वाणी कुटुंबाकडे त्या वादग्रस्त जमिनीचा गेल्या ४० ते ५० वर्षांपासून कायदेशीर ताबा असून त्यासंबंधी सन २०१५ मध्ये नगर प्रांताधिकारी यांचे समोर सुनावणी होऊन ७/१२ उताऱ्यावर वाणी कुटुंबाची महसूल नोंद झालेली आहे. असे असताना काही मंडळी बेकायदेशीर त्या जमिनीचा ताबा घेऊ पाहत आहेत. त्यासंबंधी संबंधित महिलेने तोफखाना पोलिस (पान ३ वर)

# स्वराज्याची राजधानी बनू शकलं असतं अहमदनगर!

**समाचार/नगर-दि.२८**



अहमदनगर शहराची मुहूर्तमेढ रोवली गेली, त्याला आज ५३४ वर्षे झाली. निजामशाहीची ही राजधानी होती. त्याकाळी आजच्या महाराष्ट्राचा दोन तृतियांश भूभाग निजामशाहीच्या अखत्यारित होता, म्हणजे महाराष्ट्राचा कारभार अहमदनगरमधून पाहिला जात असे, असं म्हणायला हरकत नाही. पुढे मुघल, पेशवे, शिंदे आणि ब्रिटिशांचा अंमल इथं आला.

स्वराज्याची राजधानी होण्याचं भाग्यही या शहराला मिळालं असतं, पण दोनवेळा ही संधी हुकली...

सन १६२४ मध्ये झालेल्या भातोडीच्या लढाईत मुघल आणि आदिलशाही सैन्याचा पराभव गनिमी कावा वापरून केल्यानंतर शहाजीराजांनी स्वराज्य निर्मितीसाठी प्रयत्न सुरू केले. 'स्वराज्य संकल्पक' शहाजीराजांना सर्व सरदारांची साथ मिळाली असती, तर नगरच्या किल्ल्यावर तेव्हाच भगवा फडकला असता!

**भूषण देशमुख**

मुघल बादशाह औरंगजेबाचं स्वराज्य संपवण्याचं स्वप्न धुळीला मिळालं, ते अहमदनगरमध्येच. फेब्रुवारी १७०७ मध्ये भिंगार परिसरात त्यानं शेवटचा श्वास घेतला आणि नंतर काही दिवसांनी छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र शाहूंची मुघलांच्या छावणीत सुटका झाली. स्वराज्याचा गाडा पुढं नेण्यासाठी शाहूंनी वेगानं हालचाली सुरू केल्या. ते अनेक वर्षे नगरमध्ये राहिले असल्यानं आपली राजधानी इथंच करावी, असं त्यांना वाटत होतं. तथापि, पुढं महाराणी ताराबाई – छत्रपती शाहू असा संघर्ष सुरू होऊन सत्तेचं केंद्र कोल्हापूर, साताऱ्याकडे सरकलं आणि नगरची संधी गेली.

संपादकीय

# सोना कितना सोना है?

जगभर लोक सोन्यात गुंतवणूक करतात आणि भारतात नागरिकांची सोन्यामध्ये भावनिक गुंतवणूकही असते. मुलामुलींच्या लग्नासाठी लोक सोने खरेदी करून ठेवतात. ऐपत नसतानाही प्रथा म्हणून सोने घेतात. तसेच संकटाच्यावेळी उपयोगी पडेल, म्हणूनही सोन्याची खरेदी केली जाते. गेल्या अडीच वर्षांमध्ये सोन्याच्या गुंतवणुकीवर ५० टक्के 'कंपाऊंड अॅन्युअल ग्रोथ रेट' मिळाला, अशी माहिती अॅक्सिस सिक्युरिटीजच्या वस्तू बाजार विभागाच्या तज्ज्ञांनी दिली आहे. यावेळी अक्षय्यतृतीयेच्या दिवशी भारतात सोन्याची तुफान खरेदी झाली. दसरा, दिवाळी, गुढीपाडवा, त्याचप्रमाणे विवाह सोहळ्यानिमित्त मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी केली जाते. गोल्ड एक्स्चेंज ट्रेडेड फंडातही लक्षणीय प्रमाणात पैसे टाकले जातात. सध्या युक्रेन, गाझापट्टी अशा विविध ठिकाणी युद्धे सुरू असल्यामुळे बाजारपेठेत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे जगातील मध्यवर्ती बँका आपले सुवर्णसाठे वाढवत आहेत. सोन्याचे भाव दहा ग्रॅमला ७० हजार रुपयांवर जाऊन पोहोचले आहेत. मार्चमध्ये तर ते भाव ७३ हजार रुपयांवर गेले होते. शेअर्स आणि कर्जरोख्यांप्रमाणेच एकदा बाजाराने शिखर गाठले की सुवर्ण बाजारातही तांत्रिक घसरण होऊ शकते. तशी ती एप्रिलमध्ये झालीही. २०१४ मध्ये २४ कॅरेटच्या दहा ग्रॅम सोन्याची किंमत सुमारे ३० हजार रुपये होती. ती २०१५ मध्ये २७ हजार रुपयांवर आली आणि नंतर मात्र २०१७ चा अपवाद वगळता, सातत्याने वाढत वाढत आजच्या पातळीवर आली आहे. विशेष करून २०२० मध्ये एकाच वर्षात सोन्याचे भाव ३१ हजारवरून ४६ हजार रुपयांवर गेले तर २०२३ मध्ये अंदाजे ५९ हजार रुपये असणारा भाव २०२४ मध्ये ७० ते ७३ हजारच्या आसपास गेला आहे. मात्र गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत सोन्यावरील परतावा कमी होईल. याचे कारण, २०२४ च्या उत्तरार्धात अमेरिकेतील व्याजदर घटतील आणि नंतर डॉलर वधारेल. या सर्व पार्श्वभूमीवर सोन्याच्या दरवाढीचा वेग मंदावेल, अशी शक्यता संपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. सध्या जगातील वेगवेगळ्या देशांच्या मध्यवर्ती बँका सोन्याची खरेदी करत सुटल्या असल्या, तरी आगामी दोन तिमाहींच्या दरम्यान या खरेदीचा वेग घटेल, असा अंदाज आहे. सोन्यात निधी गुंतवल्यास सुरक्षितता आणि बऱ्यापैकी फायदा या दोन्ही गोष्टी साध्य होऊ शकतात. मागच्या पाच वर्षांमध्येच भारतातली सोन्याचे भाव दुपटीपेक्षा जास्त गतीने वाढले आणि २००३ च्या तुलनेत दहापट अधिक आहेत. ज्या ज्या वेळी सोन्याच्या भावात घसरण होते, त्या त्या वेळी संधी मानून त्यात गुंतवणूक करता येऊ शकते. अर्थात सोने टप्प्याटप्प्याने आणि कमी मात्रेत खरेदी करणे इष्ट असते. शिवाय आपली गुंतवणुकीची अल्पकालीन तसेच मध्यम व दीर्घ कालावधीची उद्दिष्टे काय आहेत, याचाही विचार करावा लागतो. भारतात प्रत्येक घरात सोने साठवून ठेवलेले असते, ते अडीअडचणीला कामी येते म्हणून. भारतीय स्त्रियांना स्त्रीधन, सौभाग्यालंकार म्हणून सोन्याचे एक आकर्षणही असते. त्यामुळे बरेचदा गरज असतानाही घरातले सोने न विकण्याकडे त्यांचा कल राहतो. म्हणूनच एखाद्या कुटुंबावर बेरोजगारीची संक्रांत येते आणि उत्पन्नपातळी खालावते, तेव्हाच गोल्ड लोन्स किंवा सोने गहाण ठेवून कर्ज घेण्यावर सर्वांचा भर असतो. आर्थिक संकटाच्या वेळी पटकन पैसे उभारण्याचा हा एक सहजसोपा मार्ग आहे. या पार्श्वभूमीवर मुथुट, मणप्पुरम फायनान्ससारख्या कंपन्या फोफावलेल्या दिसतात. महानायक अमिताभ बच्चनला भरपूर मानधन देऊन जाहिरात करणेही अशा कंपन्यांना परवडते. कल्याण गोल्डसारखी कंपनी तर कॉर्पोरेट सुवर्णपेढीच आहे. सोने गहाण ठेवून, त्याच्या किमतीच्या ७५ टक्के कर्ज मिळू शकते. जेव्हा व्यक्तिगत वा गटकर्जे (अनसेक्युअर्ड लोन्स किंवा असुरक्षित कर्जे) ही उपलब्ध होत नाहीत, तेव्हा गोल्ड लोन्सची मागणी वाढते. बाजारात खूप अनिश्चितता असते, तेव्हा असुरक्षित कर्जे मिळत नाहीत. त्यावेळी गोल्ड लोन्सची मागणी जास्त असते. गोल्ड लोन अर्ध्या तासात मंजूर गेले जाते. या कर्जावर फक्त व्याज द्यायचे आणि मुदत संपताना मुद्दल फेडायचे, असा पर्याय उपलब्ध होत असल्याचे मार्केटिंग या कंपन्यांकडून केले जाते. या कर्जाची फेड झाली नाही तर ते सोने ताब्यात घेऊन लिलाव केला जातो. आज बड्या बड्या कंपन्या या क्षेत्रात उतरल्या आहेत. मात्र गोल्ड लोन देणाऱ्या कंपन्यांच्या आमिषांपासून ऋणकोंनी सावधच राहिले पाहिजे. अमेरिकन फेडरल रिझर्व्हने जून महिन्यात व्याजदरात कोणताही बदल न केल्यास डॉलर निर्देशांक आणि रोखे उत्पन्न वाढेल. त्यानंतर सोन्याच्या दरात आठ ते दहा टक्क्यांची घसरण दिसून येऊ शकते. फेडरल रिझर्व्हने आपली भूमिका स्थिर ठेवली तरी सोन्याच्या किमतीत घट दिसून येईल. सोन्याच्या भावाने व्याजदरात कपातीचा फायदा घेतला असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. याचा अर्थ सध्याच्या पातळीवरून सोन्याच्या दरात ६ ते ७ हजार रुपयांची घसरण दिसू शकते. म्हणजेच सोन्याचा भाव पुन्हा ६४ ते ६५ हजार रुपयांच्या दरम्यान घसरण्याची शक्यता आहे. देशातील फ्युचर्स मार्केटमध्ये सोन्याचा भाव ७१ हजार ७३९ रुपये प्रति दहा ग्रॅमवर पोहोचला होता, जो सोन्याचा नवा आजीवन उच्चांक ठरला. एप्रिल महिन्यात सोन्याच्या दरात सहा टक्क्यांनी वाढ झाली आहे तर चालू वर्षात गुंतवणूकदारांनी सोन्याच्या किमतीत बऱ्यापैकी कमाई केली आहे. बँकांना त्यांच्याकडील सोने बाजारात आणायला भाग पाडले गेले आणि अमेरिकन फेडरल रिझर्व्हने दरकपातीची घोषणा केली नाही तर सोन्याची झळाळी कमी होणार आहे.

# प्रगत विद्यालयात गायत्री शिंदे प्रथम



**समाचार/नगर-दि.२८**

नवीपेठ येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत परिक्षेचा (इ.१०वी) निकाल ९६.४९ टक्के लागला. विद्यालयात गायत्री पवन शिंदे ही ८५.८० टक्के मिळवून प्रथम आली. द्वितीय - रिया रणजित जव्हेरी (८२.२०%), तृतीय - महेक वाजिद पठाण (८१.४०%) मिळून यशस्वी झाले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे संस्थेच्या अध्यक्षा विजया रेखे, सचिव सुनिल रुणवाल, उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, खजिनदार व विद्यालयाचे अध्यक्ष उमेश रेखे, कार्य.सदस्य किरण वैकर, महेश रेखे, उदयकुमार भणगे, माजी अध्यक्ष दि.ना.जोशी, प्राचार्य सुनिल पंडित, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका प्रतिभा धरम, सुनिल गाडगे, जयमाला भोरे, दिलीप रोकडे, अनिता सरोदे, विजय गरड, सोनाली गाजूल व सर्व शिक्षक-शिक्षकेतर वृंदांनी अभिनंदन केले.

# अक्षय भापकर यांनी केले गिर्यारोहणाचे प्रशिक्षण पूर्ण



**समाचार/नगर-दि.२८**

हिमालयातील उत्तुंग हिमच्छादित गिरिशिखरे गिर्यारोहकांना नेहमीच आव्हान देत आले आहेत. या दुर्गम गिरिशिखरांवर चढाई करण्यासाठी गिर्यारोहणातील विविध सुरक्षा साधनांचा आणि तंत्राचा वापर करावा लागतो. यासाठी तंत्रशुद्ध प्रशिक्षण आवश्यक असते.

नगरमधील अक्षय भापकर यांनी नुकतेच माऊंटेनिअरिंग अभ्यासक्रम पूर्ण केला. उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी येथील नेहरू पर्वतारोहण संस्थान येथे एक महिना कालावधीचे हे प्रशिक्षण होते. संस्थानचे प्रिन्सिपॉल कर्नल अंशुमन भदुरिया यांच्या हस्ते पदक प्रदान करण्यात आले. भारतीय सेना दलाच्या अखत्यारीत असलेल्या या प्रशिक्षण संस्थेत देश-विदेशातील गिर्यारोहक प्रशिक्षणासाठी दाखल होत असतात. या प्रशिक्षणात गिर्यारोहणासाठी आवश्यक सुरक्षा साधने, दोर, त्यांचा तंत्रशुद्ध वापर, रॉक क्लायंबिंग, आइस क्लायंबिंग, रॅपलिंग, व्हॅली क्रॉसिंग ही आवश्यक तंत्र शिकवली. तसेच दुर्गम गिरिशिखरांवर चढाई करत असताना आवश्यक मॅप रिडिंग व नेविगेशन तंत्रज्ञान, पर्वतांची भौगोलिक रचना, येणारे अडथळे व धोके, या गोष्टीचा ही अभ्यासक्रमात समावेश होता.

# भगिनी निवेदिता



संतगाथा

भगिनी निवेदिता यांनी भारतासाठी रामकृष्ण मिशन साठी आपले जीवन समर्पित केले होते.१२ नोव्हेंबर १८९८ रोजी शारदामाता यांच्या हस्ते निवेदितांच्या 'बालिका विद्यालया'चे उद्घाटन झाले.लहान मुली, नवविवाहिता, प्रौढ, विधवा स्त्रिया या सर्वांसाठीच ही शाळा होती. या शाळेत मुलीना काय काय शिकविले जावे याविषयी स्वामीजी निवेदितांना मार्गदर्शन करीत असत. चित्रे काढणे, मूर्ती बनवणे, शिवणे, विणणे अशा विविध गोष्टी शिकून मुलींच्या हृदय आणि बुद्धीचा एकत्र व व्यवहार्य विकास कसा होईल असा विचार या शाळेने राबविला.इ.स.१८९८मध्ये मध्य कलकत्त्यात आलेल्या प्लेगच्या साथीच्या निवारणाच्या काम स्वामीजींनी निवेदितांच्या मदतीने केले. त्यामध्ये जनजागृती, स्वच्छता, रोगनिवारण या कामी त्यांनी अपरिमित कष्ट केले. या कार्यामुळे तेथील लोकांच्या मनात भगिनी निवेदितांबद्दल मोठा विश्वास उत्पन्न झाला. स्वामी विवेकानंदांच्या सहवासात निवेदितांचे शिक्षण सुरू होतेच. हिंदू धर्म व तत्त्वज्ञान यांतील विविध संकल्पना स्वामीजी त्यांना उलगडून दाखवीत होते.त्यांनी 'काली' या विषयावर दिलेल्या व्याख्यानाने तर त्या समाजात खूप प्रसिद्ध झाल्या आणि त्यांनी हिंदू धर्म अंतर्बाह्य स्वीकारला आहे याची समाजातील लोकांनाही जाणीव झाली. सन १९०१ पासून निवेदितांनी हिंदुस्थानासंबंधी व्याख्याने देण्यास सुरुवात केली आणि लेखनकार्यही केले. या लेखनाचे जे पैसे मिळत ते बालिका विद्यालयासाठी वापरले जात.४ जुलै १९०२ ला स्वामीजी अनंताच्या प्रवासाला गेले. स्वामीजींची राष्ट्रजागृतीची विचारधारा जागृत ठेवण्याचे महत्त्वाचे काम आता निवेदितांनी हाती घेतले. 'मी त्यांची मानसकन्या जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत विवेकानंदांची, त्यांच्या अंतरंगाची विस्मृती लोकांना होऊ देणार नाही' असा पण करून निवेदितांनी कार्यारंभ केला. आपल्या युवकांसमोर आणि हिंदुस्थानासमोरच आपल्या राष्ट्राचे चिह्न असावे या भूमिकेतून निवेदिताने एक वज्रचिह्न असलेला ध्वज तयार केला. सन्मान, पावित्र्य, शहाणपण, अधिकार आणि चेतना यांचा बोध करून देणारा हा ध्वज!इ.स. १९०६ साली बंगालमध्ये जो दुष्काळ पडला होता, त्यावेळी निवेदिता यांनी गावोगावी जाऊन मदत कार्य केले होते.

भारतीय कलेतील प्राचीन परंपरा,पूर्णत्वाच्या कल्पना, चैतन्य,सर्जनशीलता यांच्याशी निवेदिता एकरूप झाल्या होत्या.संस्कृती व कला हे निवेदितांचे आस्थेचे विषय होते. भारतीय कलेचे पुनरुज्जीवन करून त्याद्वारे समाज परिवर्तन आणि राष्ट्र जागरण करता येईल असे निवेदितांचे मत होते.

भगिनी निवेदिता यांनी खालील ग्रंथ लिहिले व विपुल लेखन केले त्यातील काही निवडक

* द मास्टर अज आय सॉ हिम - (मी पाहिलेले गुरुदेव),
* द वेब ऑफ इंडियन लाईफ - (भारतीय जीवनातील सूत्र) हा ग्रंथ ०७ सप्टेंबर १९०३ रोजी लिहून पूर्ण झाला. श्री. रमेशचंद्र दत्त यांच्या प्रेरणेने या ग्रंथ-लेखनाला सुरुवात झाली होती. हिंदू संस्कृती आणि समाजपद्धती या विषयावरील इंग्रजी भाषेतील अत्युत्तम ग्रंथ अशी या पुस्तकाची ख्याती होती.
* जगज्जननी काली
* नोट्स ऑफ सम वाँडरिंग्स विथ द स्वामी विवेकानंद
* स्टडीएस फ्रॉम अँन ईस्टर्न होम
* सिविल आयडियल अँड इंडियन नॅशनॅलिटी
* हिंट्स ऑन नॅशनल एज्युकेशन इन इंडिया
* ग्लिम्प्सेस ऑफ फॅमिन अँड फ्लड इन ईस्ट बंगाल - १९०६

क्रॅडल टेल्स ऑफ हिंदुइझम (हिंदुत्वातील बालरम्य गोष्टी)

* व्हाईसराय आणि बंगालची फाळणी - या नावाचा लेख 'एक अपरिचित कंठस्वर' या टोपणनावाने लिहिला. तो स्टेट्समन या वृत्तपत्रात प्रकाशित झाला.
* स्वामी विवेकानंद यांच्या समग्र साहित्याला भगिनी निवेदिता यांनी प्रस्तावना लिहिली.
* डॉन या वृत्तपत्रात प्रकाशित झालेला, 'भारतीय समाज-जीवनातील ऐक्य' हा त्यांचा अखेरचा लेख होता

१३ ऑक्टोबर १९११ रोजी भगिनी निवेदिता यांनी आपला इहलोकीचा प्रवास संपविला. निवेदितांचे कार्य नेहमीच युवकांना आणि युवतींना प्रेरणादायी ठरेल.

**- शारदा अनंत होशिंग**
समर्थ सत्संग परिवार
९४२०७४८७१८




## राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक उन्नतीचे मार्ग खुले होतील. कलेतून धनार्जन वाढणे आहे. अनुकूलतेचा लाभ उठवावा.
- **वृषभ** : सरकारी कामं मनासारखी होतील. नोकरीत अधिकार वाढतील. नव्या कामांना गती प्राप्त होईल.
- **मिथुन** : योजलेल्या कामांना विलंब होईल. महत्त्वाचे निर्णय पूर्ण विचाराने घ्यावे. संघर्षातून प्रगती होईल.
- **कर्क** : आर्थिक प्रगती होत जाईल. नव्या कामांना गती प्राप्त होईल. महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत.
- **सिंह** : परिश्रमाने यश मिळत जाईल. अडचणीतून मार्ग निघणार आहे. घाईने निर्णय घेऊ नका.
- **कन्या** : सुसंधी लाभणार आहेत. कार्यक्षेत्रात लगेच नवीन बदल करू नका. अचानक धनलाभ होईल.
- **तूळ** : योजलेली कामं मनासारखी होतील. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. अपेक्षित घटना घडतील.
- **वृश्चिक** : नव्या संधींचं स्वागत करावं. आत्मविश्वास वाढवणारा कालावधी आहे. अपेक्षित प्रगती होईल.
- **धनु** : प्रगतीसाठी अधिक प्रयत्न करावे. नव्या कामांना गती प्राप्त होईल. सुसंधींचा लाभ घ्यावा.
- **मकर** : सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. प्रगतीचा कालावधी आहे. हाती घेतलेली कामं मनाजोगी होतील.
- **कुंभ** : प्रतिकूलता कमी होणार आहे. कामांना गती प्राप्त होईल. महत्त्वाच्या घटनांनी दिलासा मिळेल.
- **मीन** : नव्या कामांना गती प्राप्त होईल. समाधानी रहावं. सरकारी कामं मनासारखी होणार आहेत.

## दिनविशेष

**२९ मे**

- **१९९०** : बोरिस येल्त्सिन रशियाच्या अध्यक्षपदी.
- **२०१३** : पारंपरिक सरकारी शिक्षणाला पर्याय ठरणाऱ्या खासगी विद्यापीठांचा मार्ग मोकळा.
- **२०१७** : जम्मू-काश्मीरमधील फुटीरतावाद्यांशी चर्चा करण्यास तयार नसल्याची भूमिका केंद्र सरकारने न्यायालयात स्पष्ट केली.
- **२०१८** : मिझोरामचे राज्यपाल म्हणून केरळचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष कुम्मानम राजशेखरन यांनी शपथ घेतली.

आरोग्यमंत्र

## दातांच्या रक्षणासाठी...

शरीरातील एक दुर्लक्षित राहणारा घटक म्हणजे दात. ते सुस्थितीत असेपर्यंत फारशी काळजी घेतली जात नाही. मात्र दुखणी उद्भवू लागल्यानंतर मात्र त्यांची खरी किंमत कळते. दातांवरचे विविध उपचार प्रचंड महाग असतात. म्हणूनच दातांप्रतीची अनास्था टाळायला हवी. दातांच्या आरोग्यावर कोणत्या गोष्टींचा दुष्परिणाम होतो हे जाणून घ्यायला हवं. ✻ आम्लांमुळे होणारी झीज हे दातांच्या समस्येचं मुख्य कारण आहे. फळांचे रस तसंच सोडा प्यायल्याने दातांवर परिणाम होतो. अशा साखरयुक्त आणि आम्लयुक्त पेयांमधून तोंडात काही घटक सोडले जातात. या घटकांमुळे आम्लाची निर्मिती होते आणि त्यामुळे दातांवरचा संरक्षित थर कमी होतो. आम्लाच्या या हल्ल्याचा प्रतिकार करण्याची क्षमता लाळेत असते.



लाळेमुळे सायट्रिक अॅसिडचा प्रभाव कमी होतो. म्हणूनच लाळेची निर्मिती करण्यासाठी शुगरफ्री चुईंग गम खाण्याचा सल्ला डेंटिस्ट देतात. ✻ दातांवर दुष्परिणाम करणारं आणखी एक कारण म्हणजे ब्रुक्सिझम. ब्रुक्सिझम म्हणजे दात कराकरा वाजणं. वय वाढलं की झोपेत दात कराकरा वाजतात. यामागील नेमकं कारण माहीत नसलं तरी हे दातांसाठी योग्य नाही. ✻ खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे दातांवर डाग पडतात. धूम्रपानामुळेही दात खराब होतात. त्यामुळेच अशा वाईट सवयी सोडल्या पाहिजेत. पांढरेशुभ्र दात हवे असतील तर सिगारेटपासून कटाक्षाने दूर रहायला हवं.

महत्त्वपूर्ण काही

## अशी ही गांधील माशी

माशांचे वेगवेगळे प्रकार असतात. घरभर फिरणारी साधी माशी असते. मधमाशी आणि गांधीलमाशीही असते. पिवळ्या रंगाच्या गांधीलमाशीची एक प्रजाती आपल्याला पहायला मिळते. तिला यलो जॅकेट म्हटलं जातं. या गांधीलमाशीच्या पोटावर पिवळे पट्टे असल्यामुळे या तिला यलो जॅकेट म्हटलं जातं. तिला सहा पाय असतात. तसंच त्यांचं शरीर तीन भागांमध्ये विभागलेलं असतं. त्यांच्या पोटाच्या खालच्या बाजूला असलेली नांगी अनेकदा बाहेर येते. त्यामुळे या माशीला त्रास देणं महागात पडू शकतं. यलो जॅकेटचा दंश वेदनादायी असतो. यलो जॅकेटच्या वेगवेगळ्या प्रजाती जगभरात आढळतात. उत्तर अमेरिकेत युरोपियन यलो जॅकेट, ईस्टर्न यलो जॅकेट आणि सदर्न यलो जॅकेट या प्रजाती आढळतात. या माशा घरट्यांमध्ये राहतात. काही घरटी जमिनीखाली तर काही झाडांवर असतात. एका घरट्यात ४ ते ५ हजार माश्या राहतात. हे घर एका हंगामापुरतं टिकतं. या माशा फळं आणि पानांमधला रस खातात. गोड पेयं, कँडी, फळांचे रस याकडेही आकर्षित होतात. मधमाश्यांच्या पोळ्यातून मध पळवतात.

सल्ला मोलाचा

## टूथब्रशचे असेही उपयोग

दर तीन महिन्यांनी टूथब्रश बदलावा लागतो. मग जुन्या ब्रशचं काय करायचं असा प्रश्न आपल्याला पडतो. पण जुने ब्रश भी काम की चीज है। या ब्रशचा वापर वेगवेगळ्या पद्धतींनी करता येऊ शकतो. कसा वापरायचा जुना ब्रश? ✻ चपला आणि बुटांच्या खालच्या भागात माती आणि चिखल अडकून बसतं. एखादा चिकट पदार्थ चिकटून बसतो. ही घाण स्वच्छ करण्यासाठी ब्रशचा वापर करता येईल. ✻ कॉम्प्युटर, लॅपटॉपचे की बोर्ड ब्रशने स्वच्छ करता येतील. की बोर्डच्या मधल्या भागात खूप धूळ साचते. ही धूळ ब्रशने नीट स्वच्छ होईल. ✻ कपड्यांवर पडलेले डाग स्वच्छ करण्यासाठी ब्रश वापरता येईल. या डागांवर साबण पावडर टाकून घासा. ✻ नळाच्या आसपासचा भाग स्वच्छ करणं वैतागवाणं असतं. यासाठी जुन्या टूथब्रशचा वापर करता येईल. ब्रशवर थोडं व्हिनेगार घालून नळ स्वच्छ करा. ✻ अंगठ्या, कानातली यांमध्ये अडकलेली धूळ, घाण ब्रशने स्वच्छ होईल. ✻ जुना टूथब्रश थोडा ओला करून ओठांवर फिरवा. यामुळे ओठांवरची मृत त्वचा दूर होईल. थंडीत हा प्रयोग करता येईल.

## पंचांग

**बुधवार, २९ मे २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
वैशाख कृ. ६, नक्षत्र : श्रवण
चंद्रराशी : मकर , ऐंद्र योग
सूर्योदय : ६.०३, सूर्यास्त : ७.०९

## फॉरवर्डस

**प्रेमात असा विरोधाभास नेहमीच बघायला मिळतो...**

तुझे सब का खयाल हैं पर मेरा नहीं,
मुझे बस तेरा खयाल हैं और किसी का नहीं

## टेक्नो टॉक

व्हॉट्स अॅप वापरल्याशिवाय राहवत नाही पण हे अॅप फोनमधली बरीच मेमरी खातं. स्टोअरेज युसेज फीचरमुळे एखाद्या कॉंटॅक्टशी संबंधित सगळे मेसेज डिलिट करता येतील. व्हॉट्स अॅप डाटा आणि स्टोअरेज युसेजमध्ये जा. चॅट सिलेक्ट करा. आता स्टोअरेज युसेजमध्ये तुमच्या मेसेजची यादी आणि हे मेसेज वापरत असलेल्या स्पेसची माहिती येईल. मेसेज डिलिट करायचा आहे तो निवडा. नको असलेल्या फाईल्स डिलिट करू शकता. मॅनेज मेसेजमध्ये जाऊन फाईल्स सिलेक्ट आणि अनसिलेक्ट करू शकता. यामुळे हवा तेवढा डाटा डिलिट करता येईल.

करिअरवाटा

## अभ्यासक्रम आत्मविश्वास वाढवणारे

विद्यार्थ्यांना हमखास नोकरी मिळवून देऊ शकतील वा व्यावसायिक क्षेत्रात उतरले तर विद्यार्थी तिथं उत्तम यश मिळवू शकतील असे काही अभ्यासक्रमांवर उपलब्ध आहेत. कारकिर्दीचा विचार करताना अशा अभ्यासक्रमांवर भर द्यायला हवा. एनआयआयटी ही संस्था माहिती-तंत्रज्ञानाशी संबंधित विविध अभ्यासक्रम आणि परीक्षा घेणारी संस्था आहे. या संस्थेने आपल्या अभ्यासक्रमांना वेगळं वळण दिलं आहे. विविध उद्योगांना कोणत्या प्रकारचे तंत्रज्ञ लागतात याची माहिती घेऊन त्यांच्या मागणीनुसार अभ्यासक्रम तयार करून प्रशिक्षण देण्याचा उपक्रम इथे राबवला जातो. म्हणजे हे अभ्यासक्रम जॉब ओरिएंटेड आणि गरजेवर आधारलेले असतात. एनआयआयटी बरोबरच अन्य काही संस्थांनीही अशा प्रकारचे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. हे अभ्यासक्रम मुख्यत्वे कंपन्यांनी सुचवलेले असतात. प्रत्यक्ष कंपन्यांशी संबंध आल्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या कंपन्यांकडूनच प्रॅक्टिकल अनुभव मिळवून दिला जातो. हे विद्यार्थी बराच काळ त्या संस्थेत काम करतात. अशा रितीने नोकरी करणार आहोत त्या कंपनीतच कामाचा अनुभव मिळत असल्यामुळे उमेदवारांचा आत्मविश्वास वाढतो यात शंका नाही.



खेचाखेची

## दारु सोडवाल का?

दारुड्या: डॉक्टरसाहेब, तुम्ही माझी दारू सोडवू शकता का?
डॉक्टर: हो..हो... नक्कीच.
.
.
आजपर्यंत मी अनेकांची दारु सोडवली आहे.
.
.
.
दारुड्या: बरं होईल मलाही मदत केली तर. पोलिसांनी माझ्या चार बाटल्या पकडल्या आहेत.

## वेगळं काही

श्रीलंकेतला किरबी डे रनेरोल हा तरूण वर्षामध्ये फक्त सात दिवसच जेवतो. तो सर्वसामान्य माणसांप्रमाणे जगतो. काम करतो. पण जेवतो फक्त सात दिवस... तेही वर्षातून... हवा, पाणी आणि सूर्यप्रकाश या घटकांचा वापर करून तो जीवंत राहतो. म्हणून त्याला जेवायची गरजच भासत नाही. तो म्हणतो की खाल्ल्यावर त्याला खूप अस्वस्थ वाटतं, विविध आजार होतात. सूर्यापासून मिळणारी ऊर्जा त्याला पुरते. त्यावरच तो जगतो. ही देवाची देगणी असल्याचं त्याचं म्हणणं आहे. डॉक्टरांनीही त्याच्या बऱ्याच चाचण्या केल्या. पण त्याच्या शरीरात जीवनसत्त्व, शरीराला आवश्यक पोषक घटकांची कमतरता नसल्याचं त्याचं म्हणणं आहे.

स्टे हेल्दी

## करा योगसाधना

योगसाधना ही आपल्या देशाची संपन्न परंपरा आणि खूप मोठा वारसा आहे. या पारंपरिक प्रकारचं नवं रुपडं म्हणजे 'योगा'. योगाचे अष्टांग योग, हट योग, विक्रम योग, अय्यंगार योग असे काही महत्त्वाचे प्रकार आहेत. पण बदलत्या काळात या प्रकारांना नवं रुपडं प्राप्त झालं आहे. पॉवर योगा, रोप योगा, अॅक्रोबॅट योगा असे नवे प्रकारही योगसाधनेत आले आहेत. सेलिब्रिटींनी मॉडर्न वर्क आउटसोबत योगाचं महत्त्व अधोरेखित केल्याने प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. प्रत्येक वयोगटाच्या व्यक्तीला योगाचे लाभ होत आहेत. गर्भावस्थेत योगा करणं अत्यंत फायदेशीर मानलं जातं. गर्भावस्थेत अवघडलेल्या स्नायूंना आराम मिळण्यासाठी योगासनांची मदत घेतली जाऊ शकते. पण यापूर्वी वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घ्या. योगाला प्राणायामची जोड दिल्यास डोकं शांत राहण्यास मदत होते. ध्यानामुळे मेंदुचे दोन्ही भाग कार्यान्वित होऊन आंतरिक क्रियांना बळ मिळतं. योगमुद्रा शारीरिक हालचालींमध्ये चपळता आणते. शरीरातील रक्ताभिसरण प्रक्रिया योग्य पद्धतीने कार्यान्वित होते. प्राणायामामुळे हृदयाच्या कार्यपद्धतीत सुधारणा होते. त्यामुळे हृदयरोग किंवा हार्ट अॅटॅक येण्याची शक्यता कमी होते.



Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी.
दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार

मंगळवार, दि. २८ मे २०२४ पान ३

## पान १ वरुन

### दाखवून साईभक्तांना लुटले

ऐवज बळजबरीने काढून घेतला. तिघे रात्रीच्या अंधारात नगरच्या दिशेने पसार झाले. दरम्यान पहाटेच्यावेळी रस्त्यावर कोणी नसल्याने फिर्यादी व त्यांचे कुटुंब घाबरले. त्यांनी कारमधून पुणे गाठले. दुसऱ्या दिवशी फिर्यादीने कोतवाली पोलीस ठाणे गाठून घडलेला प्रकार सांगितला. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक जानकर करत आहेत.

### काँग्रेसचे पोलिस अधीक्षकांना निवेदन

ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी तक्रार दिली. परंतु तोफखाना पोलिस निरीक्षकांकडून दाद न मिळाल्याने दि. २७ मे रोजी पोलिस अधीक्षकांकडे देखील त्यासंबंधी तक्रार केली. तरी देखील त्यांना न्याय न मिळाल्याने सदर महिलेने जिल्हा काँग्रेसकडे मदतीसाठी धाव घेतली. यावेळी किरण काळे यांनी तोफखाना पोलिस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे यांना तत्काळ बडतर्फ करून सदर प्रकरणाची तटस्थ चौकशी करण्याची मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्याकडे कागदोपत्री पुरावे सादर करत लेखी पत्राद्वारे केली. त्याचबरोबर शहरात वारंवार होणाऱ्या ताबेमारीच्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी संबंधित प्रकरणांची चौकशी करत दोषींवर मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करण्याची मागणी पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्याकडे केली.



## जिल्हाधिकारी; मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक

# संभाव्य आपत्तीच्या मुकाबल्यासाठी सज्ज रहा

**समाचार/नगर-दि.२८**

मान्सुन कालावधीत पूर अथवा वादळामुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता असते. या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी सज्ज राहण्याचे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मान्सुन पुर्वतयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधताना जिल्हाधकारी सालीमठ बोलत होते.



यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय घोगरे हे प्रत्यक्ष तर शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार दूरदृष्य प्रणाली द्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले की, जिल्ह्यातील मान्सुन कालावधीत पूर अथवा वादळामुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता असते. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी सर्वोतोपरी सज्ज राहावे. जिल्ह्यात पूरपरिस्थिती उदभवल्यास नागरिकांना स्थलांतरीत करण्यासाठी सुरक्षित निवाऱ्याची व्यवस्था करावी लागणार आहे. त्यामुळे निवाऱ्यांची पहाणी करुन त्याबाबत सुक्ष्म असे नियोजन करण्यात यावे. पावसाळ्यात पाण्यामुळे एस. टी. बसेस बंद पडतात.परिणामी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. त्यामुळे एस. टी. बसेसची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करून घेण्याबरोबरच एस.टी.बसेस ट्रॅकिंग सिस्टीम अद्यावत करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी श्री सालीमठ यांनी यावेळी दिले.

नैसर्गिक आपत्तीच्या काळात जनावरांना मुबलक प्रमाणात चाऱ्याची उपलब्धता ठेवण्यात यावी. तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये जनावरे मृत्युमुखी पडल्यास ज्या जनावरांचे टॅगिंग करण्यात आले आहे अश्याच जनावरांच्या मालकांना शासनामार्फत मदत करण्यात येते. त्यामुळे प्रत्येक जनावरांचे इयर टॅगिंग होईल, यादृष्टीने आवश्यक ती काळजी घेण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी श्री सालीमठ यांनी यावेळी दिल्या.

# ताराबाई कन्या विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**समाचार/नगर-दि.२८**

केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला. विद्यालयातील ७८ मुली विशेष योग्यता व ४३ मुली प्रथम श्रेणी ५ द्वितीय श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाल्या.

नक्षत्रा अमित ढोरसकर ९७ . २० टक्के गुण मिळवून प्रथम आली . पूर्वा अमित ढोरसकर ९५ टक्के गुण मिळवुन दुसरी , प्रांजल मच्छिंद शिंदे ९४ .८० गुण मिळवून तिसरी आली. यासर्व गुणवंत विद्यार्थिनींचे तसेच इ.१२वी चा निकाल ९० टक्के लागला . संस्थेचे सचिव बबनराव कोतकर ,सहसचिव रावसाहेब सातपुते, अध्यक्ष रमेश गवळी ,खजिनदार प्रल्हाद साठे यांनी तसेच राजर्षी शाहू प्रसारक मंडळाचे संचालक यांनी अभिनंदन केले .विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ यांनी सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले तसेच यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक केले.

## शहराच्या स्थापनादिनानिमित्त अहमद निजामशहा कबरीवर चादर अर्पण

# शहराची ओळख व परंपरा कायम ठेवू - सालीमठ

**समाचार/नगर-दि.२८**

सामाजिक सलोखा व धार्मिक ऐक्याचा संदेश देत ऐतिहासिक अहमदनगर शहराचा ५३४ वा स्थापना दिवस मंगळवारी (२८ मे) उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व धर्मिय धर्मगुरुंच्या उपस्थितीमध्ये जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्या हस्ते शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या बागरोजा येथील कबरीवर चादर अर्पण करण्यात आली. मराठी पत्रकार परिषद, हाजी अजीजभाई चष्मावाला सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



प्रारंभी भक्तीगीत, कविता, देशभक्तीवरील गीत, शायरी व मुशायराने बागरोजा येथे मैफल रंगली होती. उबेद शेख यांनी भजनाने सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रारंभ केले. गीतांनी कार्यक्रमात रंग भरला. शायरी, भक्तीगीत, कविता व मुशायराच्या जुगलबंदीचा आनंद उपस्थित नगरकारांनी लुटला. कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व धर्मगुरुंनी शहराच्या सुख, समृध्दी व एकात्मतेसाठी प्रार्थना केली. पाहुण्यांचे स्वागत मराठी पत्रकार परिषदेचे राज्य राज्य सरचिटणीस मन्सूर शेख यांनी केले. यावेळी उबेद शेख, संध्या मेढे, वहाब सय्यद, युनुसभाई तांबटकर, हरजितसिंह वधवा, पत्रकारांच्या नाशिक विभागीय अधिस्विकृती समितीचे सदस्य विजयसिंह होलम, ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल लांडगे, सोमनाथ जंगम देवा, शिरीश कुलकर्णी, स्नेहालयाचे हनिफ शेख, अन्सार सय्यद, आबिद दुल्हेखान, महेश कांबळे, अरुण खिची, आफताब शेख, सलिम यावर, मुफ्ती अल्ताफ, जुनेद शेख, डॉ. भास्कर रणनवरे, विक्रम क्षीरसागर, इस्माईल शेख पापामियाँ, इंजि. संजय शिंदे, भैय्या वॉचमेकर, हाजी आरिफ, नविद शेख, रवी सातपुते, रमीज शेख, फैय्याज शेख, अदनान शेख, हामजा शेख, जावेद सय्यद, कराटे प्रशिक्षक वसिम सय्यद, युसूफ सय्यद आदींसह पत्रकार, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनपाने घनकचरा दरवाढ रद्द करावी- फुलसौंदर

**समाचार/नगर-दि.२८**

घनकचरा व्यवस्थापन कर रद्द करण्यात यावा व सर्वसाधारण मालमत्ता करांमध्ये जून पर्यंत १० टक्के सूट मिळवी, या मागणीचे निवेदन प्रथम महापौर भगवान फुलसौंदर यांनी मनपा आयुक्तांना देऊन चर्चा केली. याप्रसंगी शहरप्रमुख संभाजी कदम, बाळासाहेब बोराटे, संजय शेंडगे, गिरिष जाधव, योगिराज गाडे, संतोष गेनप्पा, सचिन शिंदे, परेश लोखंडे, अशोक दहिफळे, गौरव ढोणे, संजय आव्हाड, पप्पू भाले, विशाल वालकर, प्रशांत पाटील, सुरेश क्षीरसागर आदि उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, मनपाने चालु वर्षाच्या घरपट्टी बीलांमध्ये अवाजवी वाढीव घनकचरा व्यवस्थापन कर दुपटीने वाढविण्यात आला असून, निवासी वापरासाठी पूर्वी २४० रु. होता तो आता ४८० करण्यात आला आहे. तसेच व्यावसायिकांसाठी हा कर पूर्वी १२०० रु. होता तो आता २४०० रुपये करण्यात आला आहे. ही वाढीव कर आकारणी सर्वसामान्य, व्यापारी व दुकानदार यांना न परवडणारी व अन्यायकारक आहे. ती त्वरीत रद्द करावी व पुर्वीप्रमाणे कर आकारणी करावी.

## ग.म. मुळे स्मृती व्याख्यानमाला; पुष्प दुसरे

# समाज मोठा असेल तर राष्ट्र मोठे होते- निरगुडकर

**समाचार/नगर-दि.२८**

जेव्हा समाज मोठा होतो तेव्हा राष्ट्र ही मोठे होते हे अनेक ऐतिहासिक घटनांनी सिद्ध केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात समाज मोठा होता तेव्हा हिंदवी स्वराज्यही मोठे होते. त्यांच्या निधनानंतरही नेतृत्व नसतांही मुघल राजवटीचा मराठा सैन्याने २० वर्ष औरंगजेबाशी संघर्ष करत पराभव केला व त्याला नगरच्याचमातीत गाडले. इंग्लंड मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिश समाज खंबीरपणे चर्चिल यांच्या पाठीमागे उभा राहिला, तसेच दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या विपरीत अवस्थेतून जर्मन आणि जपान यांनी समाजाच्या पाठबळावरच भरारी घेतली. त्यामुळे जेव्हा समाज मोठा असतो तेव्हाच राष्ट्रही मोठे होते. याचा विचार नागरिकांनी करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार डॉ.उदय निरगुडकर यांनी केले.

विचार भारती आयोजित कै. ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प स्पष्टवक्ते म्हणून प्रसिद्ध असलेले ज्येष्ठ पत्रकार व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विचारवंत डॉ. उदय निरगुडकर यांनी अमृत काळातील रामराज्या पुढील आव्हाने' या विषयावर गुंफले. देशाच्या स्वातंत्र्याची चळवळ ते सध्याच्या राम मंदिरा पर्यंतच्या




घटनांवर प्रकाश टाकत त्यांनी आजपर्यंत दुर्लक्षित असलेल्या अनेक घटना पोटतिडकीने पुराव्यानिशी मांडल्या. सुमारे पावणेदोन तास त्यांनी उपस्थितांना खुर्चीवर खिळवून ठेवले. यावेळी पंचगंगा सीड्सचे संचालक प्रभाकर शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. माउली सभागृहाचे व्यवस्थापक दिनकर घोडके, उद्योजक मोहन मानधना, रा.स्व.संघाचे पश्चीम महाराष्ट्राचे संघचालक नाना जाधव, सरकारी वकील सतीश पाटील, श्रीगोपाल जाखोटिया, प्रशांत आढाव, डॉ.प्रदीप चोभे आदींसह मोठ्या संख्येने विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

## आर्किटेक्ट, इंजिनिअर्स संघटनेच्या सभासदांसाठी व्याख्यान

# आधुनिक कल्पकतेतून शहर विकासाला चालना - देशमुख



**समाचार/नगर-दि.२८**

आर्किटेक्टस् इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो. अहमदनगर आणि एस आर जे स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील प्रतीथ यश आर्कीटेक्ट प्रशांत देशमुख यांचे इनोव्हेशन इन इंफ्रास्ट्रक्चर फॉर कन्स्ट्रक्शन इंडस्ट्री – एअर पोर्ट, रेल्वे स्टेशन अँड लॉजिस्टिक्स पार्क्स या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रशांत देशमुख यांनी काळानुरूप रेल्वे स्टेशन, एअर पोर्ट डिझाईन व सुख सुविधामध्ये बदल गरजेचे असून पर्यटन आणि शहर विकासात त्यांचा महत्त्वाचा भाग आहे. यांचा योग्य प्रकारे विकास केल्यास शहर वासियांच्या मानसिकतेत नक्कीच बदल होईल, असे सांगितले.

कुर्दुवाडी, हिंगणघाट, देहू रोड, आमला, सेवाग्राम, घोडा डोंगरी येथील रेल्वे स्टेशन चे डिझाईन सादरीकरण केले. तसेच बारामती चिंचवड, आकुर्डी, तळेगाव, केडगाव येथील री डेव्हलमेंट साठी असलेले डिझाईन सादर केले. रेवा एअर पोर्ट, कोईमतूर एअर पोर्ट यासाठी त्यांनी केलेल्या डिझाईन बाबत माहिती दिली.

कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये एस आर जे स्टील कंपनीचे अनिरुध्द पांडे, अविनाश पुरोहित, विशाल येसेकर आणि कंपनीचे सहकारी यांनी पुढाकार घेतला. संस्था अध्यक्ष रमेश कार्ले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मयुरेश देशमुख, संजय चांडवले, सय्यद इक्बाल, विजय पादिर, अभिषेक कार्ले, नंदकिशोर घोडके, वैभव देशमुख, उदय तरवडे आणि संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सचिव प्रदिप तांदळे यांनी सूत्र संचालन केले तर यश शहा यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## तालुक्याचा दहावीचा ९६.५० टक्के निकाल

# बारावीनंतर दहावीतही जामखेड जिल्ह्यात द्वितीय

**समाचार/जामखेड-दि.२८**

जामखेड तालुक्याचा दहावीचा निकाल ९६.५० टक्के लागला असून सात शाळांचा निकाल शंभर टक्के लागला. तालुक्यात प्रथम येण्याचा मान श्री साकेश्वर विद्यालय साकत चा विद्यार्थी शिवरत्न वराट याने ९६.६० टक्के गुण मिळवत पटकावला. द्वितीय क्रमांक ल. ना. होशिंग विद्यालय जामखेडची सानिया आतार ९६.४० टक्के गुण मिळवून पटकावला तृतीय क्रमांक जवळा येथील प्रज्ञा रोडे ९६.२० टक्के गुण मिळवून पटकावला. बारावीच्या परीक्षेच्या निकालाची परंपरा दहावीच्या विद्यार्थ्यांना राखली व जिल्ह्यात दुसरा क्रमांक पटकावला.

जामखेड तालुक्यातील एकंदरीत ३३ विद्यालयातून २३४९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी २२६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये विशेष प्राविण्य १०८५ विद्यार्थी आले, प्रथम श्रेणी ८२६, द्वितीय श्रेणी ३१० उत्तीर्ण ४६ असा ९६.५०% निकाल लागला. तालुक्यातील सात विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागलेला आहे. यामध्ये श्री भैरवनाथ विद्यालय हळगाव, केदारेश्वर विद्यालय जातेगाव, जिजामाता माध्यमिक विद्यालय घोडेगाव, विंचरणा विद्यालय पिंपरखेड, साहेबराव पाटील माध्यमिक विद्यालय पाडळी, खेमानंद इंग्लिश स्कूल जामखेड, जय हनुमान विद्यालय कोल्हेवाडी या सात विद्यालयाचा समावेश आहे.

तालुक्यातील ल. ना. होशिंग विद्यालय जामखेड ९८.४% टक्के लागला सानिया मतीन आतार हिने ९६.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला, श्रुती विश्वनाथ खेंगरे ९५.८० टक्के गुण मिळवून दुसरा क्रमांक तर प्रगती संतोष देठे हिने ९५.४० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकावला.श्री साकेश्वर विद्यालय साकत ९८.१८ टक्के, जवळा ९७.७० टक्के, नागेश विद्यालय ९५.६% टक्के, फक्राबाद ९८.८१ टक्के, भैरवनाथ विद्यालय शिऊर ९७.४३ टक्के निकाल लागला आहे.

गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब धनवे यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड तालुक्यात दहावी बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात पार पडल्या याचा परिणाम विद्यार्थ्यांनी तणावमुक्त वातावरणात परीक्षा दिल्या व चांगला निकाल लागला. बारावीच्या निकालात जामखेड तालुका जिल्ह्यात दुसरा राहिला होता दहावीचा निकालही चांगला लागला असून ९६.५० टक्के तालुक्याचा निकाल आहे. शैक्षणिक दृष्ट्या मागास समजला जाणारा तालुका आता जिल्ह्यात अग्रेसर ठरत आहे. नवोदय, शिष्यवृत्ती, बारावी व आता दहावी या सर्व परीक्षेत तालुका अग्रेसर आहे.

समाचार

वाचकांना नम्र सूचना

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

## मुंबई शेअर भाव

### शेअरबाजार स्थिर आता लक्ष निवडणुकीच्या निकालावर

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक २८-५-२०२४ दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७५३३० |
| एसीसी | २५७९-८० |
| एशियन पेंट | २८९८-९९ |
| बजाज ऑटो लि. | ८९६७-६८ |
| बलराम फूड चिनी | ३७९-८० |
| भारत फोर्ज | १५६९-७० |
| क्रॉम्प्टन | ३८९-९० |
| डीएलएफ | ८२३-२४ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ५९३०-३१ |
| ग्रॅफाईट इंडिया | ५७३-७४ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २४००-०१ |
| आयटीसी लि. | ४२९-३० |
| एल ॲण्ड टी लि. | ३६६१-६२ |
| रिलायन्स इंड. | २९२३-२४ |
| एसबीआय | ८३१-३२ |
| टाटा मोटर्स | ९४८-४९ |
| टाटा स्टील | १७५-७६ |
| टीसीएस | ३८४८-४९ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २४५-४६ |
| सुवेन फार्मा | ६४१-४२ |

# दि अंबिका महिला सहकारी बँक लि., अहमदनगर

## दिनांक ३१.०३.२०२४ अखेर संपलेल्या वर्षाचे ताळेबंद पत्रक रक्कम

**Annexure I Form A Form of Balance Sheet 31.03.2024**

| Particulars | Schedule | Current Year As on 31-March-2024 | Previous Year As on 31-March-2023 |
|---|---|---|---|
| Capital and Liabilities | | | |
| Capital | 1 | 28657450.00 | 26155275.00 |
| Reserves and Surplus | 2 | 141387453.20 | 126995725.52 |
| Deposits | 3 | 993260134.97 | 929635059.74 |
| Borrowings | 4 | 0.00 | 0.00 |
| Other liabilities and provisions | 5 | 25258338.50 | 39986968.50 |
| | | | |
| Total | | 1188563376.67 | 1122773028.76 |
| | | | |
| Assets | | | |
| Cash and balances with Reserve Bank of India | 6 | 8367234.00 | 6250194.00 |
| Balance with banks and money at call and short notice | 7 | 204211712.85 | 156692696.94 |
| Investments | 8 | 301413607.00 | 351169343.00 |
| Advances | 9 | 622412433.17 | 558470951.40 |
| Fixed Assets | 10 | 19620394.54 | 16726043.23 |
| Other Assets | 11 | 32537995.11 | 33463800.19 |
| | | | |
| Total | | 1188563376.67 | 1122773028.76 |
| | | | |
| Contingent liabilities | 12 | 1045582.44 | 951362.44 |
| Bills for collection | | 0.00 | 0.00 |

**Annexure I Form BForm of Profit and Loss Account for the year ended on31-Mar-2024**

| Particulars | Schedule | Current Year As on 31-March-2024 | Previous Year As on 31-March-2023 |
|---|---|---|---|
| I.Income | | | |
| Interest earned | 13 | 95000543.70 | 92788456.37 |
| Other income | 14 | 4218191.86 | 3759522.19 |
| Total | | 99218735.56 | 96547978.56 |
| II.Expenditure | | | |
| Interest expended | 15 | 50601285.38 | 44921805.00 |
| Operating expenses | 16 | 36875554.50 | 40525556.61 |
| Provisions and contingencies | | | 0.00 |
| Total | | 87476839.88 | 85447361.61 |
| III.Profit/Loss | | | |
| Net profit/loss(-) for the year | | 11741895.68 | 11100616.95 |
| Profit/loss(-) brought forward | | 0.00 | 0.00 |
| Total | | 11741895.68 | 11100616.95 |
